# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
## सार्वजनिक आरोग्य अभियंता,कार्यालय
## पाणीपुरवठा विभाग
## पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून १३२ केव्ही मंद्रुप सबस्टेशनहून ३३ केव्ही एक्सप्रेस फिडर लाईनवरून टाकळी हेडवर्क्स येथे विद्युत पुरवठा केला जातो. दि.१३.०५.२०२५ रोजी सायंकाळी ०७.३० पासून वादळी वारा व अवकाळी पावसामुळे विद्युतपुरवठा खंडीत झाला होता. म.रा.वि. वितरण कंपनीकडून ३३ केव्ही लाईनचे पेट्रोलिंग व तपासणी करून ३३ केव्ही लाईनवरून मिटरींग केऑक्स करीता येणा-या केबलचे जॉईटींग किट बस्ट झाल्याने त्याचे दुरूस्तीचे काम पूर्ण करून दि.१४.०५.२०२५ रोजी ३३ केव्ही लाईन दुपारी १२.४५ वाजता चालू करून दिली आहे. साधारणतः विज पुरवठा पुर्ववत चालू होणेस १२ ते १३ तासाचा कालावधी लागलेला आहे.

त्यामुळे टाकळी हेडवर्क्स येथून पाण्याचा उपसा न झाल्यामुळे आज दि.१४.०५.२०२५ रोजीचा होणारा पाणीपुरवठा  प्रताप नगर, टिळक नगर, किनारा हॉटेल परिसर, उरलेले टप्पे मजरेवाडी सहारा नगर,MIDC भाग ,समाधान नगर (भाग),साईबाबा चौक,गीता नगर,कुचन नगर,कुर्बान हुसेन नगर,पंचशील नगर इ.भागाचा पाणीपुरवठा ०१ दिवस पुढे म्हणजेच दि.१५.०५.२०२५ रोजी होणार आहे.

तरी कृपया नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही नम्र विनंती आहे.

कळावेदि.१४.०५.२०२५

सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूरमहानगरपालिका,सोलापूर

प्रति,

संपादक दैनिक.....................

उपरोक्त प्रमाणे पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन आपले दि.१५.०५.२०२५ रोजी प्रसिध्द होणा-या अंकात बातमी स्वरुपात देणेस विनंती आहे.

कळावेदि.१४.०५.२०२५